# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः16.04.2025** **वारःबुधवार**

---

**ठळक बातम्या**

- नॅशनल हेराल्ड प्रकरणी सक्तवसुली संचालनालयाकडून आरोपपत्र दाखल
- बाल तस्करीशी संबंधित गुन्ह्यांच्या प्रतिबंधासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक सूचना
- ईशान्येकडील देश भारतासाठी महत्वाचे – डॉ एस जयशंकर
- 2028 च्या ऑलिंपिकमध्ये क्रिकेटचे टी-20 सामने खेळले जाणार

आणि

-यंदा 5 टक्क्यांपेक्षा जास्त पाऊस पडण्याचा हवामान विभागाचा अंदाज

**नॅशनल-हेराल्ड**

नॅशनल हेराल्ड वृत्तपत्राशी संबंधित आर्थिक गैरव्यवहार प्रकरणात सक्तवसुली संचालनालयानं दिल्लीच्या राऊस अव्हेन्यू न्यायालयात काँग्रेस नेत्या सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांच्याविरुद्ध काल आरोपपत्र दाखल केलं. आरोपपत्रात काँग्रेसचे परदेशस्थ भारतीयांचे प्रमुख सॅम पित्रोदा, सुमन दुबे आणि इतरांची नावे देखील आहेत. या प्रकरणाची पुढील सुनावणी या महिन्याच्या 25 तारखेला होईल. असं विशेष न्यायाधीश विशाल गोगणे यांनी सांगितलं. 2014 मध्ये संचालनालयानं चौकशी सुरु केली होती. त्यात वरिष्ठ काँग्रेस नेत्यांवर असोसिएटेड जर्नल्स लिमिटेडच्या 2000 कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या मालमत्ता केवळ 50 लाख रुपयांना ताब्यात घेतल्याचा आरोप आहे. नॅशनल हेरॉल्ड हे वृत्तपत्र असोसिएटेड जर्नल्स लिमिटेडने प्रकाशित केले होतं, जे यंग इंडियन प्रायव्हेट लिमिटेडच्या मालकीचं आहे. सोनिया गांधी आणि राहुल गांधी प्रत्येकी 38 टक्के हिस्सा यंग इंडियन या कंपनीत आहे. दरम्यान, सक्तवसुली संचालनालयाची कारवाई ही केवळ सूडाचे राजकारण असल्याची टीका काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी समाजमाध्यमावरील संदेशांत केली आहे. तर केवळ सुडाचे राजकारण असं म्हटल्यानं मुख्य प्रकरणावर पडदा पडत नाही अशी प्रतिक्रिया भाजपचे प्रवक्ते नलिन कोहली यांनी दिली.

**बाल-तस्करी**

देशभरातील बाल तस्करीशी संबंधित गुन्ह्यांना प्रतिबंध करण्यासाठी आणि जलद सुनावणीसाठी मार्गदर्शक तत्त्व सर्वोच्च न्यायालयानं काल जारी केली. न्यायमूर्ती जे.बी. पार्डीवाला आणि न्यायमूर्ती आर. महादेवन यांच्या खंडपीठाने देशभरातील उच्च न्यायालयांना बाल तस्करी प्रकरणांची सुनावणी सहा महिन्यांत पूर्ण करण्यासाठी कनिष्ठ न्यायालयांना निर्देश देण्याच्या सुचना केल्या आहेत. उत्तर प्रदेशातील बाल तस्करी प्रकरणातील आरोपींनी दाखल केलेल्या अटकपूर्व जामीन याचिकांवर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने हे निर्देश दिले. न्यायात विलंब होऊ

नये म्हणून अशा प्रकरणांची दररोज सुनावणी करण्याचे आदेशही दिले. बाल तस्करी प्रकरण हाताळणीच्या उत्तर प्रदेश सरकारच्या आणि बाल तस्करीच्या आरोपींना जामीन देण्याच्या अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या निर्णयावर न्यायालयानं टीका केली. रुग्णालयातून नवजात बालकाची चोरी होत असेल तर संबंधित रुग्णालयाचा परवाना रद्द का करु नये असा सवाल न्यायालयानं उपस्थित केला.

**पंतप्रधान**
भारत आणि डेन्मार्कदरम्यान हरित उद्योग क्षेत्रातील धोरणात्मक भागीदारी दृढ करण्याला पाठिंबा असल्याचं काल सांगण्यात आलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी डेन्मार्कचे पंतप्रधान मेट्टे फ्रेडरिक्सन यांच्याशी दूरध्वनीवरून संवाद साधला. यापुर्वी 2020 मध्ये हरित उर्जा क्षेत्रातील धोरणात्मक भागीदारीसंदर्भात चर्चा झाली. ज्यामुळे भारतातील डॅनिश गुंतवणुकीसाठी अनुकूल परिस्थिती निर्माण झाली आहे. परस्पर हिताच्या प्रादेशिक आणि जागतिक घडामोडींवर काल चर्चा झाली अशी माहिती पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमावरील संदेशात दिली आहे.

**एस जयशंकर**
ईशान्येकडील देश हे शेजारील देश प्रथम, अर्थात नेबरहूड फर्स्ट, ॲक्ट ईस्ट किंवा बिम्सटेक सारख्या अनेक प्रमुख भारतीय धोरणांसाठी महत्वाचे असून पुढील वाटचालीसाठी केंद्रस्थानी आहे आणि काळानुसार या प्रदेशाची प्रासंगिकता वाढेल असं प्रतिपादन परराष्ट्र व्यवहारमंत्री डॉ एस जयशंकर यांनी काल केलं. ईशान्य प्रदेश विकास मंत्रालयानं आयोजित केलेल्या आगामी काळातील ईशान्येकडील देशांसंदर्भात गुंतवणूकदार शिखर परिषदेसाठी राजदूतांच्या बैठकीत ते बोलत होते. या भागाचा अभ्यास करावा,सरकारचं आणि उद्योगांच्या धोरणांची माहिती संबंधितांना द्यावी असं आवाहन डॉ. जयशंकर यांनी राजदूतांना केलं. भारताचे ईशान्येकडील प्रदेश पाच शेजारील देशांना लागून आहेत, जे भारतीय उपखंड आणि आसियान भागांना जोडण्याचं काम करतात. त्रिस्तरीय महामार्ग आणि कलादान प्रकल्प यांसारखे प्रकल्प महत्त्वाचे असल्याचंही जयशंकर यांनी अधोरेखित केलं.

**भारत-अमेरिका**
2030 पर्यंत भारताचा अमेरिकेसोबतचा व्यापार वाढून 500 अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचण्याची अपेक्षा असल्याची माहिती वाणिज्य आणि उद्योग सचिव सुनील बर्थवाल यांनी काल नवी दिल्लीत माध्यमांशी संवाद साधताना दिली. अमेरिकेने विविध देशांवर लादलेल्या आयात शुल्काच्या पार्श्वभूमीवर भारतासाठी चिंता आणि संधी दोन्ही आहेत. भारताने व्यापार उदारीकरणाचा मार्ग स्वीकारला आहे आणि अमेरिके सोबत द्विपक्षीय व्यापार करारासंदर्भात चर्चा सुरु आहे अशी माहितीही त्यांनी दिली.

**मंत्री मंडळ निर्णय**
महाराष्ट्रातील नगर परिषदा, नगर पंचायती, औद्योगिक नगरींच्या अध्यक्षांना पदावरून दूर करण्याच्या अधिनियमात सुधारणा करायला आणि अध्यादेश काढण्याला काल राज्य मंत्रिमंडळाने मान्यता दिली. यापूर्वी नगराध्यक्षांना पदावरून दूर करण्याच्या प्रक्रियेत; निवडून आलेल्या सदस्यांपैकी पन्नास टक्के सदस्यांच्या सह्यांचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठवला जात असे. त्यानंतर शासनस्तरावर अध्यक्षांना पदावरून दूर करण्याची कार्यवाही केली जात असे. राज्यातल्या नगर परिषदा, नगर पंचायती, औद्योगिक नगरीतील स्थावर मालमत्तांच्या भाडेपट्ट्यांच्या

नियमांत बदल करण्यात आले असून नवीन दराबाबत अधि सूचना काढण्यालाही या बैठकीत मंजूरी देण्यात आली. या स्थानिक संस्थांच्या थकीत मालमत्ता कर वसूली साठी दंड माफ करून, वसूली वाढविण्यासाठी अभय योजना लागू करण्याला या वेळी मान्यता देण्यात आली.
महाराष्ट्रातील कारागृहांमध्ये कोठडीत असलेल्या कैद्यांचा मृत्यू अनैसर्गिक कारणांमुळे झाल्यास, त्याच्या वारसांना राष्ट्रीय मानव अधिकार आयोगाच्या सूचनेनुसार भरपाई देण्याच्या धोरणाला या बैठकीत मंजुरी देण्यात आली.

**हावर्ड**
अमेरिकी सरकारच्या मागण्या मान्य न केल्यास हावर्ड विद्यापिठाला देण्यात येणाऱ्या अनुदानावर विपरित परिणाम होईल असा इशारा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी दिला आहे. ट्रंप प्रशासनाने या संस्थेसाठी 2 अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त निधी गोठवण्याचा इशारा दिला आहे. अमेरिकेतील सर्वात जुन्या विद्यापीठाला भरती, प्रवेश आणि अध्यापन पद्धतींमध्ये बदल करण्याची मागणी प्रशासनानं केली आहे. दरम्यान हार्वर्ड विद्यापीठानं प्रशासनाच्या मागण्या नाकारल्या असून व्हाईट हाऊसवर त्यांच्या संस्थेवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप केला आहे.

**हज**
भारतातून हज यात्रेसाठी जाणाऱ्या भाविकांची संख्या यावर्षी 1 लाख 75 हजारांपर्यंत वाढवण्यात आली असल्याची माहिती अल्पसंख्याक व्यवहार मंत्रालयाने समाजमाध्यामवरील संदेशांत दिली आहे. 2014 मध्ये 1 लाख 36 हजार होती. 1 लाख 22 हजारांहून अधिक यात्रेकरूंसाठी हज समिती ऑफ इंडियाच्या माध्यमातून यात्रेचं नियोजन करण्यात येणार आहे. सौदी अरेबियाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार उड्डाणे, वाहतूक, निवास आणि इतर सेवांसह सर्व आवश्यक तयारी पूर्ण करण्यात आली आहे. अशी माहिती मंत्रालयानं दिली.

**करार**
कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून प्रशासनात आमूलाग्र सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टीनं महाराष्ट्र शासन आणि आयबीएम टेक्नॉलॉजी यांच्यात काल मुंबईत सामंजस्य करार झाला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते. या कराराअंतर्गत मुंबई, पुणे आणि नागपूर या तीन ठिकाणी एआय कौशल्य आणि उत्कृष्टता केंद्र उभारली जाणार आहेत. मुंबईत भौगोलिक विश्लेषणासाठी, पुण्यात न्यायवैद्यकीय विज्ञानाच्या पायाभूत सुविधांसाठी तर नागपूरमध्ये प्रगत AI संशोधना संदर्भातील केंद्र स्थापन केलं जाणार आहे.

**पाकिस्तान**
संसदेने लागू केलेल्या वक्फ सुधारणा कायद्यावर पाकिस्तानने केलेली टिप्पणी निराधार असल्याचं परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी काल प्रसारमाध्यमांना संबोधित करताना सांगितलं. भारताच्या अंतर्गत विषयावर भाष्य करण्याचा पाकिस्तानला कोणताही अधिकार नाही. अल्पसंख्याकांच्या हक्कांचे रक्षण करण्याच्या बाबतीत पाकिस्तानने इतरांना उपदेश करण्याऐवजी स्वतःच्या देशातील परिस्थितीकडे लक्ष द्यावं असंही ते म्हणाले.

**ऑलिंपिक 2028**

2028 मध्ये लॉस एंजेलिस इथं होणाऱ्या ऑलिंपिक स्पर्धेत क्रिकेटचे सामने खेळले जातील अशी घोषणा ऑलिंपिक आयोजन समितीने काल केली. मर्यादित 20 षटकांच्या सामन्यात  पुरुष आणि महिलांचे प्रत्येकी सहा संघ यामध्ये सहभागी होतील. क्रिकेट हा खेळ ऑलिंपिक मध्ये एका शतकानंतर पुनरागमन करत असून पॅरिस इथं 1900 मध्ये शेवटचा खेळला गेला होता. लॉस एंजेलिस ऑलिंपिक स्पर्धा 14 ते 30 जुलै 2028 दरम्यान नियोजित आहेत.

**आयपीएल**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत काल चंदिगडमध्ये झालेल्या सामन्यात पंजाब किंग्ज संघानं कोलकाता नाईट रायडर्सवर 16 धावांनी विजय मिळवला. पंजाब किंग्जनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला आणि 15 षटकं आणि 3 चेंडूत सर्वबाद 111 धावा केल्या.  कोलकाता नाईट रायडर्स संघ 15 षटकं आणि एका चेंडूत 95 धावाच करु शकला. दिल्ली कॅपिटल्सचा सामना आज राजस्थान रॉयल्स बरोबर दिल्लीच्या अरुण जेटली मैदानावर खेळला जाईल.

**हवामान अंदाज**

यंदा जून ते सप्टेंबर या कालावधीत सरासरीच्या 5 टक्के जास्त पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. भारतीय हवामान विभागाचे महासंचालक डॉक्टर मृत्यूंजय मोहपात्रा यांनी काल नवी दिल्ली इथं पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. देशातल्या अनेक भागात सरासरीइतका किंवा त्यापेक्षा अधिक पाऊस पडेल, तसंच ईशान्य आणि वायव्य भारतात सरासरीपेक्षा कमी पाऊस पडण्याचा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं , नमस्कार**